# मैथिली

डॉ. सुमति क्षेत्रमाडे

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

A39

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**मैथिली : डॉ. सुमति क्षेत्रमाडे**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
₹ ४५०/-

# मैथिली

# अर्घ्ये

माझी 'महाश्वेता' कादंबरी १९६० साली प्रकाशित झाली. तिचे रसिक वाचकवर्गाकडून चांगलेच स्वागत झाले. त्यानंतर आज माझी ही नवी कादंबरी! तसे पाहिले तर तीन वर्षांचा कालावधी काही मोठा नाही. पण या दरम्यान नित्य कुणी ना कुणी विचारी,

''नवीन काही लिहायला घेतलंय की नाही? बऱ्याच दिवसांत तुमचं काही वाचायला नाही मिळालं.'' आणखी कुणी विचारी, ''आता तुमची नवीन कादंबरी वाचायला केव्हा मिळणार?''

मी उत्तर देई, ''कादंबरी लिहायला घेतलीय. पण ती पुरी केव्हा होणार हे मात्र कृपा करून विचारू नका. कारण माझा डॉक्टरी व्यवसाय आहे हे आपण सर्व जाणताच. तेव्हा...''

''हो. हो. ते जाणतो. ठीक आहे. पण कादंबरीचं नाव काय ठेवलंत ते तरी सांगा.''

असे आहे, मुलाचे बारसे त्याच्या जन्मानंतर केले जाते. पण वाङ्मयीन अपत्याचे नाव त्यांच्या जन्माआधीच अपेक्षित असते. मी नाव सांगून टाकी,

''मैथिली.''

रामायणाशी रामपंचायतनाच्या फोटोखेरीज ज्यांचा परिचय नाही अशांना 'मैथिली' हे नाव बंगाली वाटे. अलीकडे मुलींच्या आणि कथा-कादंबऱ्यांतील नायिकांच्या नावात बंगाली नावे विशेष लोकप्रिय झाली आहेत. मग मला खुलासा करावा लागे की, ''मैथिली हे नाव फार जुने आहे. आपल्या पुराणाइतकेच जुने आहे. 'मैथिली' हे सीतेचे नाव आहे. जनकाची कन्या म्हणून सीतेला जसे जानकी म्हणतात, तसेच ती मिथिला नगरची राजकन्या म्हणून तिला ''मैथिली'' म्हणतात. मैथिलीच्या म्हणजेच सीतेच्या जीवनावर ही कादंबरी आहे.''

हे स्पष्टीकरण ऐकून काही पृच्छकांचा उत्साहभंग झाला. त्यांनी म्हटले,

''अहो, कादंबरीसाठी चालू कालात सध्या इतके विषय आहेत, एवढे ज्वलंत सामाजिक प्रश्न आहेत--''

आणि मग प्रौढ कुमारिकांच्या विवाहप्रश्नापासून तो थेट व्यक्तिस्वातंत्र्य आणि समान हक्कांतून उत्पन्न झालेल्या विविध समस्यांपर्यंत अनेक विषयांची मला एक भली मोठी यादी ऐकवून त्यांनी म्हटले,

''हे असे महत्त्वाचे विषय घ्यायचे सोडून तुम्ही त्या जुन्यापुराण्या रामायण-महाभारताकडे कुठे वळलात? आज जग किती पुढे चाललंय? आणि तुम्ही...?''

आज जग पुढे जात आहे यात शंकाच नाही. कारण कालचक्राची गतीच पुढे पुढे जाण्याची आहे. तेव्हा मानव पाय रोवून जाग्यावर बसला तरी तो पुढे जाणारच. पण केवळ पुढे जाणे याला काही अर्थ आहे का? नुसत्या गतीत प्रगती असते का? काळ बदलला म्हणजे सुधारला का? समृद्ध झाला का? ज्या मार्गाने आपण पुढे जात आहोत तो मार्ग नीट पारखून आपण चाललो आहोत का? ज्यासाठी मनुष्य रात्रंदिवस धडपडत असतो, तो ऐहिक सुखसमृद्धी आणि मानसिक शांती त्याला प्राप्त झाली आहेत का?

२...

रामायण-महाभारत या ग्रंथांचा ''जुनेपुराणे ग्रंथ'' या शब्दांनी फार वेळा उल्लेख केला जातो. ''जुनापुराणा'' हा माणसाच्या व्यवहारकोशातला मोठा अर्थवाही शब्द आहे. 'पुराणा' अतएव त्याज्य, निरुपयोगी, टाकाऊ, फेकून देण्यालायक असा व्यवहारातला अर्थ आहे. रामायण आणि महाभारत ही दोन भाकडकथांनी, चमत्कारांनी आणि धार्मिक गोष्टींनी भरलेली भारुडे आहेत असा अपसमज आज रूढ झालेला आहे. या ग्रंथाचे खरे स्वरूप समजून घेण्याची आम्हाला इच्छा होत नाही. झपाट्याने पुढे जाण्याच्या धुंदीत मागे वळून बघण्याची आवश्यकता भासत नाही. अपरिचित नव्या मार्गावरून पुढे जात असता मधून मधून मागे वळून बघणे इष्ट असते हे सहसा पटत नाही. रामायण हा माझा अत्यंत आवडता ग्रंथ आहे. रामचरित्र मला लहानपणापासून विशेष प्रिय वाटते. लहानपणी मनावर झालेले संस्कार कायमचे खोलवर जाऊन बसतात. माझे लहानपण नाशिकच्या रामभूमीत गेले. घरचे वातावरण

धार्मिक. सकाळी अंघोळ झाल्यावर आणि रात्री झोपताना रोज अगदी न चुकता रामरक्षा म्हणावी लागे. देवळातून रामकथा कानी पडत. त्या वयात अर्थातच त्यातल्या अद्‌भुत कथांवर लक्ष असे. गौतमाच्या शापाने अहल्या शिळा होऊन पडली आहे आणि प्रभू रामचंद्राने त्या शिळेला पाय लावताच त्या शिळेचे पुन्हा दिव्य स्त्रीत अहल्येत रूपांतर होते, ही कथा मला एक परिकथाच वाटे. 'हात लावावे त्याचे सोने' या परिकथेसारखी!

रामायणात कित्येक प्रसंग असे आहेत की त्यांना अद्‌भुततेचे आणि चमत्कृतीचे झगझगीत लेणे चढविता येते त्या अद्‌भुत कथा ऐकत असताना त्यातले गुण, त्यातले आदर्श माझ्या मनावर नकळत ठसत होते.

मग वाढत्या वयी रामरायणाच्या गाभ्याकडे माझे लक्ष वळले. त्यातली अद्‌भुतता ओसरली, दृष्टीही बदलली आणि त्याचबरोबर ओढही वाढली. हाती लागतील ती रामचरित्रे मी वाचून काढली. त्या सगळ्यांत वाल्मीकी रामायणाने माझ्या मनाची विशेष पकड घेतली.

रामायणाशी दृढ परिचय झाला. महर्षी वाल्मीकींच्या रामायणाला आदिकाव्य म्हणतात. ते एक महान काव्य तर आहेच. पण नाट्य, नीती, धर्म, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इत्यादी अक्षरवाङमयाची सगळी मूलभूत अंगे त्यात आहेत. रामायण हे एक अपूर्व चरित्र आहे. तो एक उत्कृष्ट इतिहास आहे. रामायणात प्रगत समाजाचे, सुधारलेल्या युगाचे-आजच्यासारखी केवळ यांत्रिक अगर भौतिक सुधारणा नव्हे, तर भौतिक आणि नैतिक, आधिभौतिक आणि आध्यात्मिक, शारीरिक आणि आत्मिक या दोन्हींनी युक्त आणि समृद्ध अशा खऱ्या अर्थाने प्रगत समाजाचे त्यात संपूर्ण दिग्दर्शन आहे. म्हणून रामायण हा एक महान सामाजिक ग्रंथ आहे. कादंबरीचा निकष लावला तर रामायण ही एक उत्कृष्ट कादंबरी आहे.

३...

रामायण हे राम-सीतेच्या तीन पिढ्यांचे चरित्र. या चरित्राचा आवाका फार मोठा आहे. भारताची उत्तर सीमा जो हिमालय त्यापासून थेट दक्षिणेला लंकेपर्यंत आणि पश्चिमेला काबूल कंदाहार-गांधार देशापासून थेट अती पूर्वेपर्यंत या चरित्राचा स्थान-विस्तार आहे. यातल्या राम, सीता, लक्ष्मण, भरत, हनुमान इत्यादी प्रमुख

व्यक्ती एक एक उच्च गुणांचा आदर्श आणि भारतीय संस्कृतीचे पूर्ण विकसित रूप घेऊन आपणापुढे सजीव होऊन उभ्या राहतात. त्याग हा सर्वांचा प्रमुख स्थायी गुण आहे. किंबहुना रामचरित्राचा आणि सीतेच्या जीवनकथेचा तो पाया आहे. यातील प्रत्येक व्यक्ती गुणसंपन्न असूनसुद्धा केवळ गुणांचाच पुतळा नाही. माणूस हा सद्‌गुण आणि दुर्गुण, विकार आणि विचार, सत् आणि असत् यांच्या मिश्रणाने बनलेला आहे हे सत्ययुगातल्या महर्षी वाल्मीकींनासुद्धा मान्य होते.

राम हा रामायणाचा नायक, तो एकवचनी, एकबाणी, एकपत्नी, विलक्षण संयमी, अतुल शौर्यशाली, सगळ्या गुणांचा मुकुटमणी आणि आदर्शांचा मेरुमणी असा अलौकिक पुरुष आहे. पण लोकापवादाच्या भयाने, स्वत:च्या दिगंत कीर्तीला उणेपणा येईल या भीतीने तो निरपराध आणि निष्कलंक सीतेचा त्याग करतो. चौदा वर्षे वनवास प्राप्त झाला असता, वनवासाच्या पहिल्या रात्री झाडाखाली एकान्त स्थळी बसला असता, धीरोदात्त, प्रखर संयमी राम भावनावश होऊन पित्याचा धिक्कार करतो.

लक्ष्मण तर गुणांत आपल्या ज्येष्ठ भ्रात्याचे प्रतिबिंबच आहे. रामाचा तो बाह्य प्राण आहे. सगळे वैभव, सगळे राजविलास सोडून आपल्या ज्येष्ठ भ्रात्याबरोबर तोही चौदा वर्षे वनवासाचे खडतर जीवन स्वच्छेने स्वीकारतो. तो आदर्श भ्राता आहे. पण त्याच्यातही दोष आहे. तो शीघ्रकोपी आहे. मोठा अविचारी आहे. संयमाशी याचे सदा वाकडे! विचार करण्याचा याचा मार्ग सरळ धोपट! रामाला राज्याभिषेक करण्याची तयारी चालू असता ऐन वेळी कैकयीला वचनबद्ध होऊन दशरथाने त्याच्यावर चौदा वर्षे वनवास भोगण्याचा प्रसंग आणलेला पाहताच लक्ष्मण क्रोधाविष्ट होतो. स्वत:च्या पित्याची स्त्रीलंपट म्हणून कठोर शब्दांत निर्भर्त्सना करतो, एवढेच नव्हे तर असा स्त्रीच्या आधीन होऊन राहणारा राजा वध करण्यास योग्य आहे इथवर त्याच्या क्रोधाची मजल जाते.

भरत-स्वार्थाच्या पलीकडे गेलेली त्यागमूर्ती. पण तो प्रसंगी क्रुद्ध होतो.

कैकयी अती प्रेमळ आणि उदार आहे. सापत्न पुत्र रामावर ती भरतापेक्षाही अधिक प्रेम करते. पण ती दुराग्रही आणि हलक्या कानाची आहे. मंथरेने तिचे हलके कान भरले म्हणूनच चौदा वर्षे वनवासाचा प्रसंग उपस्थित झाला.

अशा तऱ्हेने रामायणातल्या सगळ्या प्रमुख आणि गौण व्यक्तींत गुणांबरोबर दुर्गुण आहेत. पण ते दुर्गुण इतके अल्प आहेत की त्यांच्या गुणांनी ते दुर्गुण झाकून

टाकले आहेत. त्या दुर्गुणांमुळेच त्यांच्या गुणांना उठाव मिळाला आहे. शंभर नंबर सोन्यात अगदी अल्प तांबे मिसळले की झगमगणारे उत्कृष्ट सुवर्णालंकार बनतात– ह्मणजे बनत होते. आज 'चौदा कॅरेट'चा काळ सुरू झाला आहे. सोन्याचेच नव्हे तर माणसाच्या गुणांचेही सध्या 'चौदा कॅरेट' झालेले आहे. आज दुर्गुणांनी गुणांना झाकून टाकले आहे. रामायणातील व्यक्तींत अल्प दोष आहेत म्हणूनच त्या मानवी वाटतात. त्यांच्यात गुणदोषाचे मिश्रण आहे म्हणून त्या मानवी असूनसुद्धा अलौकिक वाटतात आणि आदरस्थानी बसतात.

४...

रामायणातल्या स्त्रिया त्यातल्या पुरुषांपेक्षा अधिक मानवी म्हणून अधिक जवळच्या वाटतात. कोणत्याही युगात कुठच्याही स्थळी आढळणारे गुणदोष त्यांच्यातही आहेत. पण असे असूनही त्या स्त्रियांनी आपले स्त्रीत्व प्राणपणाने जपले आहे. स्त्रीच्या मर्यादा कटाक्षाने सांभाळल्या आहेत. सामाजिक बंधने पाळली आहेत आणि कौटुंबिक कर्तव्ये दक्षतेने पार पाडलेली आहेत. म्हणूनच त्या खऱ्या अर्थाने स्त्रिया वाटतात. त्या भारतीय स्त्रिया वाटतात.

रामायणातील ही विविध स्त्रीचित्रे निरखून पाहात असता सगळ्यात सीतेने माझे लक्ष अधिक वेधून घेतले. मिथिलेत जनकाच्या यज्ञभूमीवर अर्भकावस्थेत प्रकट झाल्यापासून तो जीवनाच्या शेवटी नैमिषारण्यात रामाच्या रायसूय यज्ञभूमीत प्रविष्ट होईपर्यंतचा तिचा सगळा जीवनपट नजरेसमोर उभा राहतो. रामाने राजधर्म हा जसा आपला सर्वश्रेष्ठ धर्म मानला होता, प्रजानुरंजन–लोकहित हे जसे स्वत:च्या प्राणापेक्षाही प्रिय मानले होते, त्याचप्रमाणे सीतेने स्त्रीधर्म हा आपला सर्वश्रेष्ठ धर्म मानला होता. स्त्रीत्व आपल्या प्राणापेक्षाही प्रिय मानले होते. या पृथ्वीवर स्त्रीचा खरा धर्म काय आहे हे यथार्थपणे सांगणारी सीतेखेरीज अन्य कुणी स्त्री आमच्या प्राचीन वाङ्मयात असेल असे वाटत नाही.

सीतेचा जीवनपट पाहताना तिची तीन रूपे प्रामुख्याने दिसून येतात. जनकाच्या घरी मिथिलेत कन्यारूपाने वावरणारी सीता, विवाहानंतर अयोध्येत आल्यावर पतिनिष्ठा प्राणपणाने सांभाळणारी रघुकुलस्वामिनी सीता, आणि पतीने त्याग केल्यानंतर वाल्मीकींच्या आश्रमात तपस्विनीसारखी राहून बारा वर्षे आपल्या पुत्रांचे यथायोग्य

संवर्धन करणारी मातेच्या रूपातील सीता. तिचे जीवनचरित्र हेच दर्शविते की स्त्रीची खरी प्रमुख रूपे हीच तीन आहेत. युगानुयुगे अगदी मानवजात निर्माण झाली तेव्हापासून स्त्रीची हीच तीन रूपे चालत आलेली आहेत. आणि यापुढेही युगानुयुगे जोपर्यंत मानव-प्राणी या पृथ्वीवर अस्तित्वात राहणार आहे तोपर्यंत ही रूपे कायम राहणार आहेत.

५...

युगायुगात काही वेळा अशा येतात, असा कालखंड येतो की त्या वेळी पुरुषांचे शौर्य कमी होते, त्यांचे सामर्थ्य कमी पडते. अशा वेळी त्याच्या साहाय्यार्थ स्त्रीला आयुधे उचलावी लागतात. आणि ती तिने उचललेली आहेत. स्वत:चे स्त्रीत्व सांभाळूनही पौरुषत्व दर्शविणारा पराक्रम तिला करावा लागतो. तो तिने केलेला आहे. महिषासुर मर्दिनीचा अतुल पराक्रम पुराणात वर्णिलेला आहेच. प्रसंग पडला तेव्हा झाशीची राणी लक्ष्मीबाई आपल्या पुत्राला पाठीशी बांधून तळपत्या तलवारीनिशी रणरागिणी बनून बाहेर पडली. पुढच्या एखाद्या युगात हेच कार्य करण्याचा पुन्हा प्रसंग पडणार नाही असे नाही.

अर्थात सगळ्याच काळातल्या लढाया रणांगणावर लढाव्या लागतात असे नाही. काळाप्रमाणे, समाजपरिस्थितीनुसार लढाईचे स्वरूप आणि आयुधे बदलतात. जीव जगविणे-स्वत:चा आणि दुसऱ्याचा-हीसुद्धा लढाईच आहे. स्वत:चे आणि कुटुंबाचे पोषण करणे-सर्वार्थाने संवर्धन करणे-हा एक संग्रामच आहे. चालू काळात तेच एक युद्ध बनले आहे. अर्थोत्पादनात पुरुषाची शक्ती कमी पडू लागली तेव्हा त्याच्या साहाय्यार्थ स्त्री पुढे आली आणि त्याच्या बरोबरीने अर्थार्जन करू लागली. जीवनाच्या विविध क्षेत्रांत ती त्याच्या बरोबरीने उभी राहू लागली.

पण हे काही स्त्रीचे स्थायी रूप नव्हे. ही काही तिची नित्याची नैसर्गिक भूमिका नाही. असे आणीबाणीचे कालखंड युगायुगातून फार थोडे येतात. सागरावर वादळे उठावीत तसे हे कालखंड असतात. हे कालखंड येतात आणि कालांतराने निघून जातात. आणि मग स्त्रीने प्रसंगोचित अशी ही घेतलेली भूमिका तिथेच संपते. पण ही भूमिका हेच आपले स्थायी रूप आहे असे मानून स्त्री जेव्हा तिच्या स्थायी स्वरूपांना